जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 OCT 2025
पुढारी




**कोल्हापूर : विद्यापीठात महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.**

**शिवाजी विद्यापीठ**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात विविध उपक्रम उत्साहात साजरे करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी राज्यशास्त्र अधिविभागाच्या डॉ. नेहा वाडेकर यांनी उपस्थितांना अहिंसेची शपथ दिली. त्यानंतर प्राचार्य डॉ. विश्वास पाटील लिखित 'कस्तुरबा गांधी यांचे जीवनचरित्र' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. यानंतर विद्यापीठ परिसरासह केएसबीपी पार्क तसेच नजीकच्या राष्ट्रीय महामार्ग परिसरात स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश नागरिकांना दिला.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, वाणिज्य व व्यवस्थापन अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगले सक्रिय सहभागी झाले. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 OCT 2025
सकाळ

# महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री जयंती



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील. शेजारी डावीकडून डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रकाश पवार, डॉ. विलास शिंदे, डॉ. तानाजी चौगुले.

## महात्मा गांधी, शास्त्री जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात विविध उपक्रम

कोल्हापूर : राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात विविध उपक्रम राबविले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत महात्मा गांधी, शास्त्री यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी राज्यशास्त्र अधिविभागाच्या डॉ. नेहा वाडेकर यांनी अहिंसेची शपथ दिली. नंतर प्राचार्य डॉ. विश्वास पाटील लिखित 'कस्तुरबा गांधी यांचे जीवनचरित्र' पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. विद्यापीठ परिसरासह केएसबीपी पार्क तसेच नजीकच्या राष्ट्रीय महामार्ग परिसरात स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम राबविली. मोहिमेत विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. परिसर स्वच्छतेचा संदेश दिला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, वाणिज्य व व्यवस्थापन अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगले, विद्यापीठासह महाविद्यालयांतील शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी सक्रिय सहभागी झाले. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 OCT 2025
सकाळ

# महाराणी ताराराणी इतिहास परिषद डिसेंबरमध्ये

## मराठा महासंघातर्फे कुलगुरू, प्र-कुलगुरूंचा सत्कार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : रणरागिनी छत्रपती ताराबाई यांच्या ३५० व्या जयंती वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे महाराणी ताराराणी राष्ट्रीय इतिहास परिषद डिसेंबर महिन्यात घेतली जाणार असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज सांगितले. अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार झाला.

मराठा महासंघाने रणरागिनी ताराबाई यांच्या जयंती वर्षानिमित्त विविध मागण्या विद्यापीठ प्रशासनाकडे केल्या होत्या. त्यापैकी महाराणी ताराबाईंचे नावे वार्षिक शिष्यवृत्ती, इतिहास परिषद डिप्लोमा कोर्स, वसतीगृह नामकरण आदी मान्य झाल्या आहेत. त्याबद्दल कुलगुरू डॉ. शिर्के यांचा सत्कार मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मुळीक, डॉ. डी. आर. मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत पाटील, संभाजीराव जगदाळे, शैलजा भोसले, शिवाजीराव मोरे, संपत्ती पाटील, संयोगिता देसाई, प्रल्हाद जाखले, यश आंबोळे, डॉ. प्रल्हाद जाखले, अजित इंगळे, अनिल साळोखे ,उमेश भोसले, शिवाजी मोरे, उमेश सावंत, शितल सरनाईक, शशिकांत साळोखे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 OCT 2025
पुढारी

# कुलगुरू, प्र-कुलगुरू यांचा सोमवारी निरोप समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा निरोप व सदिच्छा समारंभ सोमवारी (दि. ६) दुपारी ३.०० वाजता राजर्षी शाहू सभागृह येथे होणार आहे.

कुलगुरू प्रा. डॉ. शिर्के, कुलगुरू व प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पाटील यांचा कार्यकाल दि. ६ ऑक्टोबर रोजी पूर्ण होत आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठाच्या वतीने सोमवारी दुपारी निरोप व सदिच्छा समारंभाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी, अधिकार मंडळातील सदस्य, अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर्स, प्रशासकीय अधिकारी, सेवक यांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.